सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी मुर्तिजापूर शहराला पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ तातडीची पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक:- टंचाई २०१७/प्र.क्र. १४३ /पापु १४

गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक: १९ डिसेंबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक:- टंचाई २००८/प्र.क्र. १४९/पापु १४, दिनांक २१.८.२००९

२) शासन पत्र क्रमांक टंचाई २०१७/प्र.क्र.१७०/पापु-१४, दिनांक १९.१२.२०१७ (बैठकीचे इतिवृत्त)

३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक १) प्रासंनप/सलेअ/कावि-३५५/२०१७, दिनांक २५.१०.२०१७ चे पत्र., २) प्रासंनप/सलेअ/कावि-३६३/२०१७, दिनांक ०४.१२.२०१७ चे पत्र

प्रस्तावना -

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सन २०१७-१८ च्या टंचाई कालावधीसाठी मुर्तिजापूर शहराला पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ तातडीची पाणी पुरवठा योजनेचा रु. ७४८.४२ लाख किंमतीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव नागरी तथा ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणीपुरवठा योजनांना/उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखालील स्थायी समितीच्या दिनांक १५.१२.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी मुर्तिजापूर शहराला पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ घुंगशी बॅरेज प्रकल्पातून अंदाजे २० कि.मी. पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्याअंतर्गत पंपींग मशिनरी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच Rising Main २५० mm dia HDPE १००-१० kg L ची १९३२० M पाईपलाईन टाकण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. प्रस्तावातील स्टँड बाय पंपींग मशिनरी वगळण्याबाबत तसेच ईटीपी चार्जेस

४ % देऊन स्थायी समितीने रु. ७२३.४४ लाख किंमतीच्या प्रस्तावास मंजूरी दिली. त्यास अनुसरुन सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने तसेच प्रस्तावनेत नमूद केलेल्या कामांचा समावेश असलेल्या रुपये ७२३.४४ लाख (रु. सात कोटी, तेवीस लाख, चव्वेचाळीस हजार फक्त) किंमतीच्या प्रस्तावास स्थायी समितीने दिनांक १५.१२..२०१७ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने मुर्तिजापूर शहराला पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ तातडीची पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. :-

१) जिल्हाधिकारी, अकोला यांनी मुर्तिजापूर शहर क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करणे.

२) सदर योजनेच्या एकूण रुपये ७२३.४४ लाख खर्चाच्या ९०% म्हणजेच रु. ६५१.०० लाख इतके अनुदान शासनाद्वारे उपलब्ध करुन दिले जाईल. उर्वरीत रक्कम म्हणजेच योजनेच्या १०% रक्कम रुपये ७२.३४ लाख लोकवर्गणी म्हणून नगर परिषद, मुर्तिजापूर यांनी भरावयाची आहे.

३) प्रस्तुत योजना नगरपरिषद, मुर्तिजापूर यांचे मार्फत राबविण्यात यावी. तसेच प्रस्तुत योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C) म्हणून काम करेल.

१) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत. योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

२) योजनेची निविदा अल्प मुदतीची (७ दिवस) काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३) निविदा प्रक्रीया ३१ जानेवारी, २०१८ पर्यंत पूर्ण करुन कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रीया ३१ जानेवारी, २०१८ पर्यंत पूर्ण न झाल्यास योजनेची मान्यता रद्द समजण्यात येईल.

४) ३१ मार्च, २०१८ पर्यंत योजना पूर्ण करुन योजनेतून पाणी पुरवठा सुरु होणे आवश्यक आहे. तथापि, या दिनांकापर्यंत योजनेतून पाणी पुरवठा सुरु न झाल्यास योजनेची मान्यता रद्द करण्यात येईल.

५) MSEDCL कडून करण्यात येणाऱ्या विद्युतीकरणाच्या कामासाठी पूर्ण ठेव देय तत्वावर निधी MSEDCL ला देऊन सदर कामे त्यांच्या मार्फतच पूर्ण करण्यात यावीत.

६) रेल्वे क्रॉसींग तसेच रस्ता क्रॉसींग याबाबतची परवानगी संबंधित यंत्रणांकडून तातडीने प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

७) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी योजनेच्या सुरवातीस सदर योजनेकरिता शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित ५०% निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याच्या आकस्मिक निकडीच्या पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी सचिवस्तरीय स्थायी समिती स्थापन केली असून सदर समितीच्या दिनांक १५.१२.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२१९१६०४३२५८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2017.12.19 17:32:01 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. विभागीय आयुक्त, अमरावती
८. जिल्हाधिकारी, अकोला,

९. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अमरावती
१०.मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., अमरावती
११. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अकोला
१२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अकोला
१३.कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अकोला
१४.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., अकोला
१५.मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुर्तिजापूर, ता. अकोला, जि. अकोला.
१६. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१७. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१८. पापु १४ (निवडनस्ती)